**वाचले :-**
१) शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.२ डिसेंबर १९९७.
२)शासन निर्णय क्र. अंनियो-२०१९/प्र.क्र.४७०/सेवा-४, दि.९ मे २०२२
३)आदेश क्रमांक साप्रवि/३/कावि/६०४/२०२४,दि.०१/०३/२०२४
४)मा.उपसंचालक,नगररचना व विकास विभाग,यांचेकडील पत्र क्र.नरवि/आ-२/कावि/६१०/ २०२४,दि.२७/१२/२०२४
५)श्री.मोमीन अब्दुलअजीज अखिलअहमद, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांचा दि. १२/०८/२०२४ रोजीचा विनंती अर्ज
६)मा.आयुक्त यांचेकडील दिनांक११ /०२/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/१३ /२०२५
दिनांक११ /०२/२०२५

**विषय :- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाचा राजीनामा मंजूर करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर जाहिरात क्र. १८४/२०२२ अन्वये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या अभिनामाची रिक्त पदे सरळसेवेने भरणेत आली होती. कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर पे लेवल एस-१४ वेतनश्रेणी र.रु. ३८६००-१२२८०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेकामी उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये आदेश निर्गत करणेत आला आहे. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावरील श्री.मोमीन अब्दुलअजीज अखिलअहमद यांनी राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे.श्री.मोमीन अब्दुलअजीज अखिलअहमद यांचा मनपा सेवेतील रुजू दिनांक, राजीनामा देण्याचे कारण, मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव | मनपा सेवेत रुजू दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा अर्ज दिनांक | मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. | मनपा सेवेचा राजीनामा देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.मोमीन अब्दुलअजीज अखिलअहमद | ०५/०३/२०२४ | १२/०८/२०२४ | C/११५० दि.१२/०८/२०२४ अन्वये र.रू. ४४,९००/- | बांधकाम विभाग,जिल्हा परिषद लातूर, येथे कनिष्ठ अभियंता पदावर निवड |

श्री.मोमीन अब्दुलअजीज अखिलअहमद यांनी बांधकाम विभाग,जिल्हा परिषद लातूर, येथे कनिष्ठ अभियंता पदावर निवड झाल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. श्री.मोमीन अब्दुलअजीज अखिलअहमद यांचाकडून महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज येणे बाकी नाही व सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसून त्यांचा राजीनामा मंजूरीबाबत संबंधित विभागप्रमुखांनी स्पष्टपणे शिफारस केली आहे. श्री.मोमीन अब्दुलअजीज अखिलअहमद, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांनी मनपा सेवेचा राजीनामा देणेकामी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार मनपा कोषागारात मुळ वेतन भरल्याची पावती सादर केली आहे.

सबब, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. २ डिसेंबर १९९७ मधील तरतुदी, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व कर्मचा-यांनी केलेला विनंती अर्ज विचारात घेता मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रस्तुतच्या आदेशान्वये उपरोक्त श्री.मोमीन अब्दुलअजीज अखिलअहमद यांचा कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाचा मनपा सेवेचा राजीनामा दि.१२/०८/२०२४ पासून मंजूर करण्यास मान्यता देत आहे. तसेच दि.१२/०८/२०२४ पासून ते आदेशाचे तारखेपर्यंतचा कालावधी विनावेतनी करण्यात यावा. त्याचप्रमाणे लेखापरिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती संबंधित कर्मचा-यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.मोमीन अब्दुलअजीज अखिलअहमद यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति -
श्री.मोमीन अब्दुलअजीज अखिलअहमद, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)
प्रत -१. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३. दूरसंचार ४. माहिती व जनसंपर्क विभाग
५.कामगार कल्याण विभाग ६.साप्रवि टेबल क्र. ७,१०,१२,२२, संग.कक्ष (साप्रवि)
७. नगररचना व विकास विभाग, ८.सर्व संबंधित विभाग ९.माहिती तंत्रज्ञान विभाग

उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८